**आजचा शुभ विचार**

“"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वत:च्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-38 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 11 June 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ३८ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. ११ जुन २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## 'शरद पवार आणि अजित पवार एकत्र येतील का?'

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मिश्कील उत्तर “माझ्याकडे मनातले ओळखण्याची शक्ती नाही”

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याची चर्चा एप्रिल महिन्यापासून सुरु झाली. मात्र शरद पवार आणि अजित पवार एकत्र येतील दोन्ही राष्ट्रवादी एक होतील या चर्चा २०२४ च्या डिसेंबर महिन्यापासून सुरु आहेत. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापन दिन पुण्यात पार पडला. यावेळी शरद पवार यांनी भाषण करत असताना पक्ष फुटला, फुटायला नको होता म्हणत एक भाष्य केलं. अजित पवार आणि शरद पवार एकत्र येतील का? याबाबत विचारलं असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या खास शैलीत उत्तर दिलं.

**आपल्या पक्षात फूट पडली आहे पण...-शरद पवार**

आपल्या पक्षात फूट पडली, फूट पडावी असं काही वाटत नव्हतं पण फूट पडली. काही मुलभूत विचारांमध्ये फरक झाला आणि फूट पडली. जे राहिले आहेत ते विचारांनी राहिले आहेत. उद्या निवडणुका होतील तेव्हा वेगळं चित्र बघायला मिळेल. १९८० मध्ये माझ्या हाती सत्ता होती. त्यावेळी निवडणूक झाली होती आणि ५० ते ५२ आमदार निवडणून आले. पुढच्या सहा महिन्यात ६ आमदारच शिल्लक राहिले. बाकी सगळे ५० ते ५२ आमदार सोडून गेल होते. त्यानंतर जी निवडणूक आली तेव्हा राष्ट्रवादीची संख्या ७२ झाली. राज्य सरकारमध्ये काम करता आलं. त्यामुळे फुटीची चिंता करु नका. आपण एकसंध राहिलो आणि जनतेशी बांधिलकी कायम ठेवली तर काहीही फरक पडत नाही, असं वक्तव्य शरद पवार यांनी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात केलं आहे. दरम्यान अजित पवार आणि शरद पवार एकत्र येतील का हा प्रश्न आज देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी विचारला.

**देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?**

“ शरद पवार -अजित पवार एकत्र येतील का? हे तेच सांगू शकतात, त्यांनी पूर्णविराम दिलाय का? तेच सांगू शकतात. यातल्या कुठल्याच गोष्टीवर माझ्याकडे अशी शक्ती नाही की त्यांच्या मनात शिरुन त्यांच्या मनातलं जाणून तुमच्यापुढे ठेवू शकेन.” असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. जयंत पाटील सगळ्या जबाबदाऱ्यांमधून मुक्त करा हे त्यांना मुक्त करणार असल्याचं माहीत असल्याने म्हणाले? त्यांच्या मनात काही दुसरं आहे का? हे सगळं समजून घ्यावं लागेल. असं देवेंद्र फडणवीस मिश्किलपणे म्हणाले.

अजित पवार आणि शरद पवार एकत्र येण्याच्या चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सुरु आहेत. मात्र दोन्ही नेत्यांनी याबाबत भाष्य केलेलं नाही. आता देवेंद्र फडणवीस यांना याबाबत विचारलं असता ते दोघंच याबाबत सांगू शकतात असं म्हटलं आहे. महापालिका निवडणुका जवळ आल्या आहेत या पार्श्वभूमीवर नेमकं काय होतं ते पाहणंही महत्त्वाचं असणार आहे.

## 'सोनम रघुवंशीने लग्नानंतर सात दिवसातच आखला राजाच्या हत्येचा कट', हनिमून मर्डरचा नवा पैलू समोर

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत





सोनम रघुवंशी उत्तर प्रदेशच्या गाझीपूरमध्ये पोलिसांसमोर शरण आल्यानंतर या प्रकरणातले अनेक नवनवे खुलासे पोलिसांकडून केले जात आहेत. त्यात सोनम रघुवंशीनं तिचा प्रियकर राज कुशवाह याच्या मदतीने पती राजा रघुवंशीची हत्या केल्याचा गंभीर दावाही आहे. आता सोनमने लग्नानंतर सात दिवसातच राजाच्या हत्येचा कट रचला होता अशीही माहिती समोर आली आहे.

**पोलिसांनी नेमकं काय सांगितलं?**

अतिरिक्त पोलीस उपायुक्त राजेश दंडोतिया यांनी पीटीआयला सांगितलं की मेघालय पोलिसांनी राजा रघुवंशीच्या हत्या प्रकरणात राज कुशवाह, विशाल चौहान आणि आकाश राजपूत या तिघांनाही अटक केली आहे. त्यांची रवानगी न्यायालयाने ट्रान्झिट कोठडीत सात दिवसांसाठी केली आहे. राजाचा मृतदेह २ जूनला मिळाला. तरीही सोनम बेपत्ता होती. तिला ९ तारखेला अटक करण्यात आली. दरम्यान सोनमने राजाची हत्या करायची हे १८ मे रोजी म्हणजेच लग्नानंतर अवघ्या सात दिवसांतच ठरवलं होतं तसा कटही तिने आखला होता असं राजेश दंडोतिया यांनी सांगितलं.

**पोलीस अधिकारी राजेश दंडोतिया काय म्हणाले?**

१) राजा रघुवंशीचा मृतदेह २ जून रोजी मिळाला. त्यानंतरही त्याची पत्नी सोनम बेपत्ता होती. तिने उत्तर प्रदेश पोलिसांच्या समोर ९ जूनला शरणागती पत्करली

२) सोनम आणि राज या दोघांचं अफेअर होतं. राजा रघुवंशीच्या हत्येचा कट सोनमने १८ मे रोजी म्हणजेच लग्न झाल्यानंतर सात दिवसांतच आखला होता. सोनम आणि राजा यांनी हा कट आखला होता, अशी माहिती राजेश दंडोतिया यांनी दिली.

३) राज कुशवाह हा सोनमच्या भावाच्या कंपनीत वितरणाचं काम पाहतो. त्याने तिघांना राजाची हत्या करण्याची सुपारी दिली. पोलिसांनी राज कुशवाह आणि चौहानला इंदूरहून अटक केली. तर आनंद कुमार आणि सागर यांनाही मध्य प्रदेशातील दुसऱ्या एका ठिकाणाहून अटक केली.

४) सोनमचे कॉल रेकॉर्ड पोलिसांनी तपासले तेव्हा तिचा सहभाग हत्येत आहे हे पोलिसांना समजलं.

५) ज्यांना सुपारी देण्यात आली होती त्यांना सोनमने लाईव्ह लोकेशन पाठवण्याचं काम सोनमने केलं होतं असाही दावा पोलिसांनी केला.

६) मेघालयातील विशेष तपास समितीने म्हणजेच एसआयटीने हे सांगितलं की राजाच्या मृतदेहावर खुणा होत्या, तसंच धारदार शस्त्राने हल्ले केल्याच्या खुणा आहेत असंही सांगितलं.

७) राजाच्या आईने सांगितलं की हनिमूनला जाण्यापूर्वी सोनमने तिकिटं बुक करण्यासाठी राजाकडून ९ लाख रुपये घेतले होते. हॉटेलचं बुकिंग आणि तिकिटांचं बुकिंग सोनमने केलं होतं. तसंच हनिमूनला जाताना आपण दागिनेही घेऊन जाऊ असाही आग्रह सोनमने केला होता. ही माहिती पोलिसांनी दिली.

**राजा आणि सोनमचा विवाह ११ मे रोजी झाला होता**

राजा आणि सोनम यांचा विवाह ११ मे रोजी झाला होता. त्यानंतर हे दोघं २० मे रोजी हनिमूनला गेले होते. सुरुवातीला ते बंगळुरुला गेले. त्यानंतर गुवाहाटी या ठिकाणी जाऊन या दोघांनी कामाख्या देवीचं दर्शन घेतलं. तिथे या दोघांनी फोटोही काढले. २२ मे रोजी ते शिलाँगला गेले. त्यानंतर त्यांचा संपर्क तुटला होता. त्यांनी भाडे तत्त्वावर घेतलेली स्कूटर आढळून आली होती. या दोघांचा शोध सुरु आहे. २ जून रोजी राजाचा मृतदेह सापडला. यानंतर सात दिवसांनी सोनम पोलिसांना शरण आली. हिंदुस्थान टाइम्सने हे वृत्त दिलं आहे.

## पनवेलमध्ये बांगलादेशींचा सुळसुळाट, 'घरजावई' बनलेत: छापासत्र थांबणार की वाढणार?

### पनवेल बांगलादेशींचा मोठा अड्डा! ३५ बांगलादेशी नागरिकांवर कारवाई

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



पनवेल पुन्हा एकदा बांगलादेशी घुसखोरांच्या मोठ्या अड्ड्यामुळे चर्चेत आहे. पनवेल शहर आणि तालुका पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत तब्बल ३५ बांगलादेशी नागरिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईने परिसरात खळबळ उडाली असली तरी, हा प्रश्न किती गंभीर आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पनवेल परिसरात अनेक ठिकाणी बांगलादेशी नागरिकांचा मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. यापूर्वीही अनेकदा कारवाई करूनही हे नागरिक पुन्हा त्याच ठिकाणी मोठ्या संख्येने राहत असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. चिखले गावातील एक बांगलादेशी नागरिक तर इतका निर्ढावलेला आहे की, पाच-सहा वर्षांपूर्वी कारवाई होऊनही तो आजही तिथेच 'घरजावई' बनून राहत आहे! ९ मे रोजी पनवेल तालुका पोलिसांना खेरणे परिसरात बांगलादेशी नागरिक राहत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ छापा टाकला. या कारवाईत ११ पुरुष आणि १२ महिलांसह एकूण २३ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आलं. त्याचबरोबर, पनवेल शहर पोलिसांना तक्का कातकरवाडी येथेही बांगलादेशी नागरिक असल्याची खबर मिळाली. पोलिसांनी तिथेही छापा टाकून ४ पुरुष, ३ महिला आणि ५ मुलांसह एकूण १२ बांगलादेशी नागरिकांवर कारवाई केली. या सातत्याने होणाऱ्या कारवाया आणि त्यानंतरही बांगलादेशी नागरिकांची वाढती संख्या, हा पनवेलसाठी एक गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा कधी निघणार, हा प्रश्न अनुत्तरितच आहे

## सिंहस्थ २०२६ च्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये विशेष प्राधिकरण स्थापनेची तयारी सुरु

### प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी विभागीय आयुक्तासह 21 सदस्यांची नियुक्ती, राज्यपालांच्या मंजुरीनंतर कामांना गती

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



नाशिकमध्ये होणार्या सिंहस्थ कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर विशेष प्राधिकरणाची घोषणा करण्यात आली असून, या प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी विभागीय आयुक्तासह 21 सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुंभमेळा आयुक्त हे या प्राधिकरणाचे सदस्य सचिव म्हणून राहणार आहेत. या प्राधिकरणाची स्थापना करण्याची अधिसूचना सोमवारी प्रकाशित करण्यात आली असली, तरी त्यावर राज्यपाल राधाकृष्णन यांनी दि. 3 जून रोजीच स्वाक्षरी केली आहे. राज्यपालांच्या सहीने प्राधिकरणाची अधिसूचना राजपत्रात प्रकाशित करण्यात आलेली आहे. उपाध्यक्षपदी जिल्हाधिकारी या प्राधिकरणामध्ये एकूण 22 सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. नाशिकचे विभागीय आयुक्त हे अध्यक्ष म्हणून राहणार आहेत, तर नाशिकचे जिल्हाधिकारी आणि नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक हे उपाध्यक्ष म्हणून राहणार आहेत. या प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांमध्ये अहमदनगरचे जिल्हाधिकारी यांच्यासह नाशिक विकास प्राधिकरणाचे आयुक्त, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त, नाशिकच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, त्र्यंबकेश्वर नगरपालिकेचे मुख्याधिकारी, नियोजन विभागाचे उपायुक्त, नियोजन, विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र, राज्य रस्ते परिवहन महामंडळ, आरोग्य विभागाचे उपसंचालक, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता, विद्युत मंडळाचे अधीक्षक अभियंता, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी, सहसंचालक (लेखा व कोषागारे), नाशिक नगररचना विभाग सहसंचालक हे पदसिद्ध सदस्य असतील, तर कुंभमेळा आयुक्त हे सदस्य सचिव असणार आहे. या प्राधिकरणाच्या बैठका दर तीन महिन्यांनी होणार आहेत. या बैठकीच्या संदर्भात अध्यक्ष हे सर्व निर्णय घेतील, तसेच दोनतृतीयांश बहुमत नसेल, तर पुढील 24 तासांमध्ये बैठक घेण्यासंदर्भातला निर्णय हे अध्यक्ष घेऊ शकतात, असे स्पष्ट करण्यात आले आहे. अध्यक्षांना सल्ला घेण्यासाठी म्हणून कोणाला बोलवायचे व कोणाला नाही याबाबतचा निर्णयदेखील अध्यक्ष घेऊ शकतात. कुंभमेळ्यासाठी तयार करण्यात आलेली विकास कामे किंवा इतर काही बाबींचे पुढे काय करायचे, याचा निर्णय प्राधिकरणाने घ्यायचा आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. दर महिन्याला प्राधिकरणाच्या कामाचा अहवाल हा मंत्री समिती पुढे द्यावयाचा आहे, तसेच मंत्री समितीची परवानगीदेखील घ्यावी लागणार आहे. वेगवेगळ्या नियमांप्रमाणे प्राधिकरणाला काम करायचे आहे, असे प्राधिकरणासाठी काढण्यात आलेल्या अध्यादेशात म्हटले आहे.


अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

# लोकलची जीवघेणी गर्दी, निरपराध प्रवाशांचे बळी

मुंबईची विस्तारीत उपनगरे असलेल्या दिवा-मुंब्रा दरम्यान खचाखच गर्दीने धावणाऱ्या लोकलमधील दरवाजात उभे असणारे काही प्रवासी खाली पडले आणि त्यातच काहींचे बळी गेले तर काही जखमी झाले. सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस. या दिवशी मुंबईतील उपनगरी रेल्वेगाड्या तुडुंब गर्दीला घेऊन धावत असतात. मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ दोन लोकल गाड्यांतील दरवाजात उभे असलेले प्रवासी एकमेकांना घासले गेले, त्यातूनच काही जण खाली पडले व ही दुर्घटना घडली अशी माहिती सुरुवातीला पुढे आली. नेमके किती मृत्युमुखी पडले किंवा नेमके किती जखमी झाले याची माहितीसुद्धा धड मिळत नव्हती. मुंबईच्या उपनगरी रेल्वेतून रोज पंचाहत्तर लाखांहून अधिक प्रवास करतात. एवढ्या संख्येने प्रवाशांना घेऊन धावणारी क्षमता जगात कुठेही नसावी. रात्रीचे चार तास सोडले तर सीएसटी-चर्चगेटपासून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेल आणि विरार, पालघर, डहाणूपर्यंत लोकल्स धावत असतात. मध्य, पश्चिम, हार्बर मार्गावरील उपनगरी सेवा ही तर मुंबईची जीवनवाहिनी आहे. आता मेट्रो, मोनो मुंबईकरांची अत्यावश्यक सेवा बनली आहे. लोकल्स आणि मेट्रो हा मुंबईकरांचा श्वास आहे. मग ही सेवा चोवीस तास तत्पर व कार्यरत ठेवणे हे जसे रेल्वेला आव्हान आहे तर रेल्वेचे कर्तव्यही आहे. याच महामुंबईतून देशाच्या खजिन्यात सर्वात जास्त महसूल जमा होतो. याच महानगरातून देशाला सर्वात जास्त जीएसटी मिळतोय. त्या बदल्यात रेल्वे मंत्रालय ७५ लाख मुंबईकरांचा रोजचा लोकल प्रवास सुखाचा व्हावा म्हणून काय सेवा सुविधा देते? मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील दादर, कुर्ला, घाटकोपर, ठाणे, कळवा, डोंबिवली, कल्याण तसेच अंधेरी, वसई-विरार या स्थानकांवर नेहमीच गर्दीचा कहर असतो. सीएसटीवरून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेलला जाणाऱ्या व येणाऱ्या लोकल्स तुडुंब गर्दीने नेहमीच भरलेल्या असतात. कोंडवाड्यात जशी जनावरे दावणीला असतात, त्याहीपेक्षा लोकलमधील प्रवाशांची अवस्था वाईट असते. मुंब्रा येथे कसाराहून सीएसटीकडे जाणारी व सीएसटीहून कसाराकडे जाणारी या लोकल जात असताना दरवाजात उभे राहून लटकून प्रवास करणारे एकमेकांना घासले गेले व त्यातले डझनभर खाली पडले असे सांगण्यात आले. धावत्या लोकलमध्ये प्रवाशांना स्वत:चा तोलही सांभाळता आला नाही, जे खाली पडले त्यांना धरून किंवा खेचून पुन्हा डब्यात आणणे इतरांना शक्य झाले नाही. या अपघातात कुणी किती जखमी झाले, कोणाचे हात-पाय मोडले, कुणाला जीव गमवावा लागला याचा तपशील नंतर येईलच, पण गर्दीने भरलेल्या लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडले ही बाब अतिशय गंभीर आहे. ही वेळ त्यांच्यावर का आली, त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर कोणी देणार नाही. देशात जिकडे तिकडे वंदे भारत एक्स्प्रेस सुरू होत आहे. वंदे भारत ट्रेनची क्रेझ वाढत आहे. पण मुंबईतील लोकल्समधून रोज प्रवास करणारे लाखो प्रवासी मात्र वाऱ्यावर सोडले आहेत. रोज पोटापाण्यासाठी व रोजगारासाठी लक्षावधी मुंबईकर गर्दीने भरलेल्या लोकल्समधून दोन-अडीच तास प्रवास करीत कामावर पोहोचत आहेत आणि त्याच गर्दीतून सायंकाळी-रात्री घरी परतत आहेत. गर्दीचे दुष्टचक्र संपणार कधी? लोकल प्रवाशांना दिलासा कधी? लोकलमधून मुंबईकरांना कधी सुखाने प्रवास करायला मिळणार? सर्वसामान्य लोक कोणीही हौस म्हणून लोकलने प्रवास करीत नाहीत. स्वस्तात व जलद प्रवास करता येतो म्हणून लाखो लोक लोकल्स प्रवासाकडे आकर्षित होतात. गेल्या दोन वर्षांत एअर कंडिशन्ड लोकल्स धावू लागल्या आहेत. जशी त्यांची संख्या वाढत आहे तसे विना एसी लोकल्स कमी होत आहेत. मुंबईत एसी लोकल्स हव्या आहेत, त्याला मागणीही बरीच आहे. एसी लोकल्समधून प्रवास करणारा वर्गही मोठ्या संख्येने आहे. पण सर्वसाधारण लोकल परवडते म्हणून त्या लोकलने प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांवर अन्याय होता कामा नये याची दक्षता रेल्वे प्रशासनाने घेतली पाहिजे. गेल्या वीस वर्षांत मुंबईत झालेल्या रेल्वे अपघातात ५१,८०२ लोकांचा मृत्यू झाला. मुंबईत रेल्वे अपघातात रोज सात ते आठ लोक मरण पावतात. पण त्याची कुठे बातमीही प्रसिद्ध होत नाही. 'रोज मरे त्याला कोण रडे' अशी मुंबईच्या उपनगरी रेल्वेची अवस्था झाली आहे. सन २०२५ या नवीन वर्षात जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत मुंबईत रेल्वे अपघातात ६६३ लोक ठार झाले. त्यातले २७२ जण लोकलमधून खाली पडून मरण पावले, तर ३९१ जण रेल्वे रूळ ओलांडताना मृत्युमुखी पडले. दोन लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडून मरण पावले किंवा जखमी झाले, असे प्रथमच घडले असावे. आता तरी राज्य सरकार, केंद्र सरकार व रेल्वे प्रशासन यांचे डोळे उघडणार आहेत की नाही? मुंबईतील लोकल प्रवासावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही? प्रत्येक ट्रेनमध्ये प्रत्येक लोकलच्या डब्यात विनातिकीट अनेक प्रवासी असतात. प्रथम श्रेणीच्या डब्यातही विनातिकीट लोकांची अगदी महिलांचीही बरीच गर्दी असते. आपल्याला तिकीट कोणी विचारायला येणार नाही याची त्यांना खात्री असते. विनातिकीट प्रवासी हे दैनंदिन पासधारकांना रोजची डोकेदुखी असते पण धावत्या लोकलमध्ये डब्यात येऊन तिकीट तपासणी जवळपास बंदच झाली आहे. मध्य व पश्चिम रेल्वेचे टीसी जातात कुठे हा पासधारकांना रोज प्रश्न पडलेला असतो. भिखारी, फेरीवाले, विक्रेते, डब्यात गलिच्छ फडकी मारून सफाई केल्याचा आव आणणाऱ्यांची गर्दी भरपूर असते. हातात तान्हे बाळ घेऊन भीक मागणाऱ्यांची संख्याही बरीच आहे. हे सारे लोक स्टेशनात तरी कसे येतात, लोकलमध्ये कसे चढू शकतात? यांना रोखणारी, हटवणारी, व कारवाई करणारी यंत्रणा कुठे दिसत नाही. लोकलधील खचाखच गर्दीमध्ये पाकीटमार व मोबाईल चोरांच्याही टोळ्या सावज शोधत असतात. पण कुठे रेल्वे पोलिसांचा त्यांना धाक आहे असे कुठे दिसत नाही. मुंब्रा येथे गर्दीत तोल न सावरता आल्यामुळे डझनभर प्रवासी खाली पडले, ही गर्दी नियंत्रित होणार नसेल तर पुढेही असे अपघात होत राहतील. मुंबईची जीवनवाहिनी सुरक्षित राहिली पाहिजे याची जबाबदारी रेल्वे प्रशासन व रेल्वे पोलिसांची आहे.

# कृषी अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक; बोगस कंपन्यांना संरक्षण हर्षल ठाकरे यांचा आरोप अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करा

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------

धुळे जिल्ह्यातील काही कृषी अधिकारी शासकीय पदाचा गैरवापर करून स्वत:च्या अथवा नातेवाईकांच्या नावाने बोगस खते, बियाणे व जैविक कीटकनाशके उत्पादक कंपन्या चालवत असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) किसान सेलचे जिल्हा कार्याध्यक्ष हर्षल ठाकरे यांनी केला आहे. शेनपूर येथे खरीप हंगामपूर्व नियोजन बैठकीदरम्यान कृषी सहसंचालक (नाशिक विभाग) यांना हे निवेदन देण्यात आले. यामध्ये त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांविरोधात तपास व कठोर कारवाई करण्याची मागणी केली. ठाकरे यांनी आरोप केला की, काही




अधिकारी स्थानिक कृषी सेवा केंद्रांवर बोगस कंपन्यांची उत्पादने जबरदस्तीने विक्रीस लावत आहेत. या उत्पादनांची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असून, त्यामुळे शेतकऱ्यांचे पीक उत्पादन घटून आर्थिक नुकसान होत आहे. त्यांनी पुढे सांगितले की, फक्त ₹२०० दराने खरेदी केलेले खते तब्बल ₹१००० दराने शेतकऱ्यांना विकले जात असून, हे प्रकार म्हणजे थेट लूट आहे. प्रयोगशाळा तपासणी प्रक्रियेतही पक्षपात होत असून, ठराविक कंपन्यांचेच नमुने पाठवले जातात. ठाकरे यांनी पुढील मागण्या मांडल्या: संबंधित अधिकाऱ्यांवर व त्यांच्या कंपन्यांवर सखोल चौकशी करावी. बोगस कंपन्यांचे परवाने त्वरित रद्द करावेत. दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन करून फौजदारी कारवाई करावी. प्रयोगशाळा तपासणीत पारदर्शकता ठेवावी. . संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करावी. शेतकरी आधीच हवामानातील बदल, कर्जबाजारीपणा आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे त्रस्त असताना, कृषी अधिकाऱ्यांकडून होणारी फसवणूक ही अत्यंत धक्कादायक बाब असल्याचे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

# डी एस अहिरे यांची काँग्रेसला सोडचिठ्ठी साक्री तालुक्यात आता घड्याळाची टिकटिक वाजणार, मोठे बदल आणि समीकरणे बदलणार

विनोद मोरे
दैनिक स्वराज्यदूत
साक्री शहर प्रतिनिधी
----------------

धुळे माजी खासदार डी.एस.अहिरे यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गट घड्याळात प्रवेश केला आहे. 2024 च्या विधानसभा निवडणुकीत साक्रीतून काँग्रेसचे तिकीट निश्चित असतानाही धुळे जिल्ह्यातील भाजपाच्या दोन बड्या नेत्यांनी प्रदेशाध्यक्षावर दबाव आणून आपले तिकीट कापले, असा आरोप अहिरे यांनी केला आहे. तसेच लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या खासदाराचा प्रचार करूनही त्यांनी आपल्या नावाची शिफारस केली नाही, त्यामुळे काँग्रेसमध्ये आपल्याला रस उरला नसल्याचं अहिर यांनी सांगितल. त्यांच्या या प्रवेशामुळे साक्री तालुक्यात आता घड्याळाची टिकटिक वाजणार असुन मोठे राजकीय बदल अपेक्षित आहेत आणि तालुक्यातील समीकरणेही बदलणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. काँग्रेस सोडण्या मागची खदखद आणि अजित पवारा सोबतची नवी सुरुवात. अहिरे यांनी काँग्रेस सोडण्यामागचं कारण स्पष्ट करताना सांगितले की, मी काँग्रेस पक्षाचा सच्चा पाईक



होतो. मी आमदारकी साठी उभा असतानाही तालुक्यातील काही नेत्यांनी काँग्रेसमध्ये राहूनही माझ्या विरोधात उघड प्रचार करत अपक्षाला मदत केली. त्यांनी पुढे म्हटले, मी 2024च्या लोकसभा निवडणुकीत खासदार गोवाल पाडवीना पूर्ण मदत केली, तसेच विधानसभेतही काँग्रेसला मदत केली. मात्र मला 2024 ला काँग्रेसचे तिकीट निश्चित असतानाही जिल्ह्यातील दोन भाजपाच्या बड्या नेत्यांनी माझे तिकीट कापण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. विद्यमान खासदारांनी माझ्या नावाची साधी शिफारस केली नाही, त्यामुळे मला आता काँग्रेसमध्ये रस उरला नव्हता. डी एस आहिरे यांनी आपल्या राजकीय प्रवासात शरदचंद्र पवार यांनी आपल्याला राजकारणात आणल्यालाच आणि दहा वर्ष अजित पवारांसोबत विधानसभेत काम केल्याचं सांगितलं. त्यांचे मार्गदर्शन लाभल्याने आणि त्यांच्या कामकाजाच्या पद्धतीमुळे आपण यशस्वी झाल्याचही त्यांनी नमूद केल. आता अजित पवारांच्याच नेतृत्वात आपला राजकीय प्रवास सुरू ठेवणार असून, आदिवासी भागात राष्ट्रवादीचे काम भक्कमपणे उभे करेल. नव्हे तर अजित पवाराच्या माध्यमातून विकासाचे पर्व सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले. डी एस अहिरे एक अनुभवी प्रशासक आणि लोकप्रतिनिधी. डी.एस. अहिरे यांचा राजकीय आणि प्रशासकीय अनुभव मोठा आहे. त्यांनी 1993 ते 97 पर्यंत प्रशासकीय सेवेत उपजिल्हाधिकारी तथा प्रांत अधिकारी म्हणून काम केले आहे. जानेवारी 1998 मध्ये त्यांनी प्रशासकीय सेवेचा राजीनामा देऊन काँग्रेस पक्षातर्फे खासदार म्हणून निवडणूक लढवली आणी मताधिक्याने विजयी झाले. त्यावेळी ते 13 महिने खासदार होते. त्यानंतर सरकार कोसळल्यानंतर त्यांनी साक्री तालुक्यात आमदारकी लढवली आणि 19 हजार मतांनी विजयी झाले. 2014 ते 19 पर्यंत त्यांनी पुन्हा आमदारकी लढवून विद्यमान आमदार मंजुळा गावित यांचा 3500 मतांनी पराभव करून ते निवडून आले होते . 2001 ते 2003 पर्यंत ते नाशिक माढा बोर्डाचे चेअरमन होते, तर 2003 ते 04 पर्यंत राज्य नियोजन मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी यशस्वी कामगिरी बजावली. अहिरे यांच्या पत्नी कुसुमताई अहिरे या 2019 ते 2023 पर्यंत आदिवासी पश्चिम पट्ट्यातील कुडाशी ग्रामपंचायतीवर लोकांनी नियुक्त सरपंच होत्या, तर मुलगा धीरज अहिरे यांच्या माध्यमातून 2019 ते 2025 पर्यंत जिल्हा परिषदही ताब्यात घेतली. प्रशासकीय कामाच्या अभ्यासातून त्यांनी पाझरा नदी, कान नदी, आणि जामखेडी नदीवर अनेक पूल बांधून दोन गावांना जोडले. तसेच त्यांनी मोठ्या गावाची विभागणी करून 42 स्वतंत्र महसूल गावे केली. त्यांच्या या अनुभवाचा राष्ट्रवादी काँग्रेसला साक्री तालुक्यात फायदा होऊन राजकीय गणिते बदलतील का,हे पाहणे महत्वाचे ठरेल.

# श्री. राजेंद्र खरे (म्हसदे) यांचा सेवापूर्ती सोहळा इजमाने गावात मोठ्या उत्साहात संपन्न

## शहरात राहून सुद्धा गावासोबत नाळ तुटू न देणे खरोखरीच अभिमानास्पद :- भाऊसाहेब आहिरे

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------

बागलाण तालुक्यातील नामपूर जवळील इजमाने येथिल रहिवासी असलेले राजेंद्र कचरू खरे (म्हसदे) ह. मु. म्हारळगाव (शहाड ) यांचा नुकताच सेवापूर्ती सोहळा इजमाने येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहापूर तालुक्यातील आटगाव येथील पद्मश्री आण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ, भिवंडी संचलित आटगाव विभाग हायस्कूल आटगाव येथे त्यांनी ३१ वर्ष सेवा बजावली. या सेवापूर्ती सोहळ्यासाठी बागलाण तालुक्याचे आमदार दिलीप मंगळू बोरसे, नामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब अहिरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर रेखा म्हसदे यांनी स्वागतगीत सदर केले. तसेच सनी खरे याने आपल्या आई वडिलांच्या समर्पित नृत्य सादर करून उपस्थितांना गहिवरून आणले. यानंतर आमदार दिलीप बोरसे, भाऊसाहेब अहिरे, शशिकांत धोंडगे, लोटन धोंडगे, विलास धोंडगे तसेच श्री राजेंद्र खरे यांच्या मातोश्री सुमनबाई खरे यांचा सत्कार करण्यात आला. आमदार दिलीप मंगळू बोरसे यांच्या हस्ते सत्कारमूर्ती राजु खरे यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले भाऊसाहेब











अहिरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, लोक गावाकडून एकदा शहराकडे गेले की, त्यांना आपलं मुळगाव नकोस वाटतं, मात्र राजू नाना यांच्या बाबतीत प्रकर्षाने सांगावेसे वाटते की, आपल्या गावाची नाळ त्यांनी कधी तुटू दिली नाही. याच कारणाने शहरात नोकरी करून त्यांनी आपल्या सेवापूर्तीचा कार्यक्रम हा आपल्या जन्मगावी घेतला हे खरोखर अभिमानास्पद आहे. त्यांचा सारखा मित्र आता नोकरीच्या प्रपंचातून मोकळा झाला आणि माझ्या बरोबर सामाजिक, राजकीय कामात बरोबरीने काम करेल अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी लोटन धोंडगे, शशिकांत धोंडगे, मोठे बंधू भरत खरे यांनीही आपले मनोगत व्यक्त करत त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्यात.

यानंतर उपस्थित नातेवाईक, मित्रपरिवार आणि गावकऱ्यांनी राजेंद्र खरे आणि त्यांच्या पत्नी संगीता खरे यांचा सेवापूर्तीचा निमित्ताने सत्कार केला. यासर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार दादा खरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी कृष्णा पवार, अमोल धोंडगे, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष शेखर बच्छाव, सागर खरे, विजय म्हसदे, अशोक म्हसदे, राकेश म्हसदे, यश खरे, सनी खरे, राहुल म्हसदे, सचिन म्हसदे यांसह सर्व आप्तस्वकीय, मित्रपरिवार आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोधेश्वर पब्लिक स्कूल मध्ये प्रि - प्रायमरी वर्ग सुरू

## शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांवर फुलांचा वर्षाव आणि केक वाटप करून केले स्वागत

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------














येथील दोधेश्वर पब्लिक स्कूलचे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे प्रि- प्रायमरी वर्ग आज पासून सुरू करण्यात आले. यावेळी या बाल गोपाळांचा शाळेचा पहिला दिवस अत्यंत आनंददायी आणि उल्हासात्मात वातावरणात साजरा करण्यात आला. सुरुवातीला सटाणा महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक एकनाथ येवला सर, संस्थेच्या सचिव श्रीमती मनोहरम्मा सुलू आणि विद्यार्थ्यांच्या हस्ते फित कापून शाळेत प्रवेश देण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी स्वतः मुख्याध्यापिका श्रुती शेट्टी, शिक्षिका वैशाली पगार, अर्चना पाटील यांनी पुष्पवृष्टी करून फुग्यांनी उभी केलेली स्वागत कमान सोबत मिकी माऊस याने विद्यार्थ्यांशी हस्तांदोलन केले. त्यानंतर रोशनी पाटील, नेहा बागुल, माहेश्वरी कापडणीस यांनी औक्षण करून सेल्फी पॉईंट येथे आणून प्रत्येकाचे छायाचित्र काढले. यानंतर मिकी माऊस आणि विद्यार्थ्यांनी एकत्र नृत्य करून आनंदोत्सव साजरा केला. शाळेच्या वतीने प्रत्येक विद्यार्थ्याला केक वाटप करण्यात आला. पहिल्याच दिवशी अशा प्रकारे शाळेत स्वागत पाहून चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसून आला तो खरोखरच अवर्णनीय होता. विविध प्रकारचे खेळणी, देखावे, शाळेच्या मुख्य दरवाजा पासून ते वर्गापर्यंत संपूर्ण शालेय परिसरात केलेली सजावट आणि रांगोळी अत्यंत आकर्षक दिसत होती. त्यानंतर वर्गातील विविध शैक्षणिक साहित्य हे लहान मुलांसाठी शिक्षणाबरोबर शाळेत रममाण करण्यासाठी खरोखर खूपच सुंदर असल्याचे यावेळी पालकांनी बोलून दाखविले. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी नवागत विद्यार्थ्यांचे टाळ्या वाजवून स्वागत केले. लहान मुलांच्या दृष्टीने हे शैक्षणिक दालन अत्यंत आनंददायी, संस्कारक्षम असून आसपासच्या परिसरात आणि सटाणा शहरातील पालकांनी आपल्या पाल्यांना दोधेश्वर पब्लिक स्कूल मध्ये दाखल करून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना द्यावी असे आवाहन श्रुती शेट्टी यांनी केले. यावेळी शाळेचे कार्यालयीन प्रमुख दादा खरे, शिक्षक राहुल येशी, दीपक पाटील, विनय वालिया, शिक्षिका माधुरी देवरे, मनिषा सोनवणे, वर्षा जगताप, प्रतिभा खैरनार, अमृता जाधव, अंजली विसपुते, रूपाली जाधव, वृषाली खैरनार, पूजा जाधव, वर्षा सोनवणे यांसह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय योग दिन नियोजनाची बैठक संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------



प्रतिवर्षाप्रमाणे यंदा देखील सर्व समावेशक आंतरराष्ट्रीय योग दिन संयोजन समितीचे वतीने २१ जून या दिवशी पोलीस मैदान येथे मोठ्या प्रमाणात साजरा होणार आहे. या दृष्टीने तयारी सुरू झाली आहे. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने या तयारीसाठी सर्वसमावेशक विविध सामाजिक संघटनांची बैठक गायत्री प्रज्ञापीठ धुळे या ठिकाणी रविवार आठ जून रोजी संपन्न झाली. यावेळी आयोजनासाठी आवश्यक विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सुमारे दहा हजार नागरिक, विद्यार्थी इत्यादींसाठीचे नियोजन व्यवस्थित पार पाडण्यासाठी आयुष मंत्रालय भारत सरकार यांनी आखून दिलेल्या प्रोटोकॉल नुसार सदर उपक्रम संपन्न होईल. सदर बैठक प्रसंगी संयोजन समिती प्रमुख ओमप्रकाश खंडेलवाल, रवीजी बेल पाठक, अड. यशवंतराव जाधव, राजेंद्र बारे, डॉ. भूपेंद्र मालपुरे ,अमित गोराणे ,अतुल दहिवेलकर, प्रकाश पांडे, राकेश जैन , मनोहर चौधरी तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे स्वप्निल बोडे राज्य योगा मार्गदर्शक योगेश्वरी मिस्तरी हजर होते. गायत्री परिवाराचे सुधाकर दादा बेंद्रे, एन के उपाध्ये, लीलाधर अजंदेकर तसेच धुळे योग विद्या धामचे डॉ. जितेंद्र भामरे, यशवंत पाटील, पतंजली योगपीठाचे डॉ. राजेंद्र निकुंभ, भारत विकास परिषदेचे राजेश वाणी, सुनील कपिल, विजयसिंह सिसोदिया, अजय कासोदेकर, डॉ.भालचंद्र मोरे, डॉ. गणेश जयस्वाल, नितीन देवरे ,प्रथमेश गांधी, मोनाली सैंदाणे , उमेश मुसळे आदी उपस्थित होते.

# खरीप हंगामपूर्व ग्रामस्तरीय बैठक मौजे शेणपूर येथे उत्साहात संपन्न

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------





खरीप हंगामपूर्व ग्रामस्तरीय बैठक मौजे शेणपूर, तालुका साक्री, जिल्हा धुळे येथे दिनांक ८ जून २०२५ रोजी उत्साहात पार पडली. या बैठकीचे आयोजन तालुका कृषी अधिकारी कार्यालय, साक्री यांनी मंडळ कृषी अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने केले होते. या कार्यक्रमास मा. विभागीय कृषी सहसंचालक श्री. सुभाष काटकर साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी खरीप पेरणीपूर्वी योग्य बियाण्यांची निवड, बीज प्रक्रिया तसेच मका पिकावरील रोगनियंत्रण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रसंगी गावचे सरपंच श्रीमती निकिता काकुस्ते, ग्रामपंचायत सदस्य श्री. चंद्रकांत काळे, पोलीस पाटील श्री. हेमराज काळे, प्रगतशील शेतकरी श्री. दामोदर पगारे व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. पत्रकार व यांच्यासह महिला बचत गट अध्यक्ष सौ. आशाबाई काकुस्ते व गावातील महिला-पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. तालुका कृषी अधिकारी श्री. योगेश सोनवणे यांनी सोयाबीन व मका पिकांची बीज प्रक्रिया कशी करावी, तसेच सोयाबीन बियाण्याची उगवण क्षमता चाचणी कशी घ्यावी याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक अनुभवातून वैज्ञानिक माहिती मिळाली. या यशस्वी कार्यक्रमासाठी मंडळ कृषी अधिकारी सौ. दीपमाला बिरारिस, श्री. तानाजी सदगीर, उप कृषी अधिकारी श्री. गोकुळ पवार, सहाय्यक कृषी अधिकारी श्री. ललित अहिरराव, श्री. निखिल शिंदे, श्री. स्नेहल बोरसे, श्री. राजू बारसे, सौ. प्रियांका भामरे, सौ. जयश्री साळुंखे आणि सौ. सीमा सोनावणे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी सुसंगत मार्गदर्शन मिळाले असून, बीज प्रक्रिया आणि उगवण क्षमता चाचणीमुळे उत्पन्नात निश्चितच वाढ होईल, असा विश्वास उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली होती.

# नर्मदा जीवनशाळेचा पहिला विद्यार्थी सियाराम सिंगा पाडवी डॉ. हिरालाल चौधरी बेस्ट फिश फार्मर पुरस्काराने सन्मानित

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------




नर्मदा बचाव आंदोलनाचा युवा कार्यकर्ता व जनआंदोलनाच्या नेत्या मेधाताई पाटकर यांच्या प्रयत्नांनी सुरु झालेल्या जीवनशाळेतील पहिला विद्यार्थी सिड्या उर्फ सियाराम सिंगा पाडवी यांस मत्स्यपालन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुंबई येथे हिरालाल चौधरी बेस्ट फिश फार्मर पुरस्कार २०२४-२५ देऊन गौरविण्यात आले. सियाराम सिंगला पाडवी,मुळगाव डनेल ता अक्कलकुवा तालुक्याचा नर्मदा जीवन शाळेचा पहिला विद्यार्थी. नर्मदा बचाओ आंदोलनाने खुप प्रयत्नानंतर ही शासनाची शाळा चालत नव्हती म्हणून गावकऱ्यांच्या मागणी नुसार जीवन शाळा चालू करण्याचा निर्णय घेतला.ऐन संघर्षाच्या काळात चिमलखेडी येथे आंदोलनाची पाहिली जीवन शाळा सुरू झाली. सिंगा वेस्ता पाडवी यांचा मुलगा सिड्या याला ही जीवन शाळेत दाखल करण्यात आले. जीवन शाळेची घोषणाच आहे की,जीवन शाला की क्या है बात? लडाई -पढाई, साथ साथ! याप्रमाणे शिक्षणासोबत विद्यार्थी सत्याग्रह, मोर्चे, धरणे आंदोलनात संमिलीत होत असत,सिड्या गाणे म्हणणे,घोषणा देणे यात अग्रेसर.आजही आपण आंदोलनाची जुने व्हिडिओ पाहाल तर त्यात गीत गाणारा, घोषणा देणारा सिड्या दिसेल. सरदार सरोवर धरणाची पाण्याची पातळी वाढल्याने चिमलखेडी येथील जीवन शाळा बुडितात आली ,त्यासाठी मुलांनी संघर्ष केला.पुढे ती शाळा मणिबेली येथे स्थलांतरित झाली. चौथी पर्यंत जीवन शाळेत शिकून सिड्या ५वी च्या शिक्षणासाठी धुळे येथे राजेंद्र छात्रालयात दाखल झाला.मग तो सिड्या वरून सियाराम असे नाव त्याच्या शिक्षकांनी दिले.१२ वी पर्यंत शिकल्यानंतर सियाराम आंदोलनात पूर्णवेळ कार्यकर्ता झाला. ज्या लोकांची घरे व जमिनी सरदार सरोवर धरणात बुडिताखाली आली त्यांना पुनर्वसनाचा लाभ मिळाला परंतु जे बुडितातल्या गावातील वरच्या पाड्यावर राहतात किंवा मासेमारी करून आपला उदरनिर्वाह करतात त्यांच्यासाठी आंदोलनाची सुरुवातीपासून मागणी होती की याच गावांमधील आदिवासी कुटुंबांना मासेमारीचा अधिकार मिळाला पाहिजे म्हणून शासन दरबारी मागणी व पाठपुरावा सतत सुरू ठेवला त्यामुळे महाराष्ट्र शासनाने नर्मदा काठावरील गावांच्या सहकारी सोसायटीला सरदार सरोवर जलाशयावर अधिकार मंजूर करीत, शासनाच्या अनुदानातून जाळे, नावडी, बोट, केज कल्चर, मत्स्यबी, मत्स्य खाद्य दिले. सियाराम ने जवळपास २६ सहकारी सोसायट्या स्थापन केल्या. त्याचा संघ बनवला व संघाने सियारामला अध्यक्ष बनवले. सियाराम गावागावात जाऊन मच्छीमार समित्यांना मदत करतो, आता लवकरच धडगाव येथे, मत्स्य मार्केट व मासे साठवणूक साठी वेअर हाऊस बांधकामाच्या जागेसाठी सियाराम पाठपुरावा करीत आहे. सियाराम मुळे मासेमारी समित्यांच्या शेकडो परिवाराच्या जीवनात मासेमारी वर अधिकार मिळवून देत खऱ्या अर्थाने जहां जमीन डूबी हमारी,पानी-मछली कैसे तुम्हारी? नुकताच सियाराम सिंग पाडवी (ता. अक्कलकुवा) यांनी मत्स्यपालन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून ICAR-CIFE (Central Institute of Fisheries Education), मुंबई तर्फे दिला जाणारा डॉ. हीरालाल चौधरी बेस्ट फिश फार्मर पुरस्कार २०२४-२५ पटकावला आहे. सियाराम पाडवी सन २००८ पासून सरदार सरोवर प्रकल्पग्रस्त भागात २६ मच्छीमार सहकारी संस्था स्थापन, ७३ किमी क्षेत्रातील १२५८ मच्छीमारांना एकत्रित करून शासन योजना प्रभावीपणे पोहचवण्याचे काम, दुर्गम भागात सहकार्याची नवी उंची गाठली. नंदुरबारच्या जिल्हाधिकारी मा. डॉ. मिताली सेठी यांचे मोलाचे सहकार्य व मत्स्य व्यवसायाविषयी तांत्रिक मार्गदर्शन किरण पाडवी, सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय नंदुरबार यांचे मार्गदर्शन लाभले. सियारामच्या या गौरवाबद्दल जनआंदोलनाच्या राष्ट्रीय नेत्या मेधाताई पाटकर, चेतन साळवे, लतिका राजपुत, ॲड. योगिनी खानोलकर, पुण्या वसावे, नूरजी वसावे, ओरसिंग पटले,रामभाऊ चौधरी, सुनील पावरा, गंभीर पाडवी, शामजी पाडवी, जोरदार पावरा, कृष्णा पावरा, नाथ्या पावरा आदींनी अभिनंदन व कौतुक केले.

# धाडणे ग्रामपंचायतीतील लाखोंच्या घोटाळ्याविरोधात बेमुदत उपोषण सुरु

## 2018 ते 2022 दरम्यानच्या ऑडिट अहवालाने उघड केला भ्रष्टाचाराचा भांडाफोड

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------




साक्री तालुक्यातील धाडणे येथील ग्रामपंचायतीत २०१८ ते २०२२ या कालावधीत मोठ्या प्रमाणावर झालेल्या आर्थिक अनियमिततांचा भांडाफोड झाल्यानंतर, भ्रष्टाचारमुक्त समिती, धाडणे यांनी ग्रामपंचायतीच्या भ्रष्ट कारभाराविरोधात साक्री पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास आजपासून प्रारंभ केला आहे. ऑडिट अहवालानुसार अधिकृत लेखा परीक्षकांच्या अहवालात उघड झाल्याप्रमाणे, बनावट बिलांच्या आधारे निधीची उचल, अपात्र लाभार्थ्यांना वाटप, तसेच विकास कामांमध्ये अपारदर्शकता व निकृष्ट दर्जाचे काम , विकास कामाची तांत्रिक , प्रशासकिय मान्यता न घेणे कामाचे मोजमाप पुस्तिकेत नोंद नसणे, मुंल्याकन, अंदाजपत्रक देखील ग्रा.प. कडे उपलब्ध नसणे.इ. गंभीर बाबी यांसारख्या गंभीर प्रकारांमुळे लाखो रुपयांचा अपहार झाल्याचा ठपका तत्कालीन ग्रामपंचायतीवर ठेवण्यात आला आहे. असे असूनही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई नाही; त्यामुळे नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. या आर्थिक घोटाळ्यांची माहिती संबंधित प्रशासकीय विभागांना वेळोवेळी देण्यात आली, मात्र कोणतीही ठोस कारवाई अद्याप झाली नाही, यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. समितीच्या कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन करत "दोषींवर तात्काळ कारवाई झाली पाहिजे, अन्यथा आंदोलन जिल्हाभर पसरवू" असा इशारा दिला आहे. सदर भ्रष्टाचाराविरुद्ध ग्रामस्थांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. उपोषणस्थळी गावातील महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. "गावाचा पैसा खाणाऱ्यांना माफी नाही", "न्याय मिळेपर्यंत माघार नाही" अशा घोषणा देत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. नागरिकांनी फलक, निवेदने व निषेध पत्रके घेऊन आंदोलनात भाग घेतला. या सर्व प्रकरणात प्रशासनाचे मौन मात्र संशयास्पद आहे. प्रशासकिय अधिकारी चौकशीत दोषींना वाचवित आहेत का ? ते सगंनमत झालेत का असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.आंदोलनाला सुरूवात होऊन अनेक तास उलटून गेले असतानाही कोणताही वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाला नाही, हे विशेष उल्लेखनीय आहे. त्यामुळे प्रशासन कारवाई टाळत आहे का, असा प्रश्न ग्रामस्थ विचारू लागले आहेत. त्यामुळे भ्रष्टाचारमुक्त समितीची तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. "गावाचा पैसा हडप करणारे मोकळेपणे फिरत आहेत, ही प्रशासनाच्या अपयशाची लक्षणे आहेत. प्रशासन जर कारवाई करत नसेल, तर आम्ही ही लढाई जिल्हास्तर तसेच वरीष्ठ स्तरापर्यत वर नेऊ," अशी ठाम भूमिका समितीच्या प्रतिनिधींनी घेतली आहे.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# धुळेच्या मातीतून उगमलेला तेजस्वी तारा...!
# श्री. इंद्रजीत सुरेंद्र काकुस्ते यांची SDO पदावर पदोन्नती!

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------



शांत स्वभाव, मृदू भाषा आणि कठोर परिश्रम यांचा सुंदर संगम म्हणजेच श्री. इंद्रजीत सुरेंद्र काकुस्ते (राजन). पाटबंधारे विभाग, धुळे (सुलवाडे बॅरेज) येथे उपविभागीय अभियंता (SDO) पदावर नुकतीच त्यांची यशस्वी पदोन्नती झाली असून, हा केवळ एक कारकीर्दीतील टप्पा नसून त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचा आणि सेवाभावाचा सन्मान आहे. श्री. काकुस्ते यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात आपला ठसा उमटवत नव्या पिढीपुढे "कष्ट करा आणि योग्य वेळेची वाट बघा" हा मूलमंत्र जगून दाखवला आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण कुटुंब आणि परिसरात आनंदाचे वातावरण आहे. काकुस्ते यांचे कुटुंबीय आणि नातेवाईकांनी त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या असून, "यशाच्या अजून अनेक शिखरांवर तुझं नाव कोरलं जावो, " अशी भावना व्यक्त केली आहे.

# आम्ही वारकरी परिवार सेवाभावी संस्थेकडून पंढरपूर येथे धर्मशाळेचा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------




आम्ही वारकरी परिवार सेवाभावी संस्थेकडून दिनांक ९ जून रोजी नांदेड जिल्ह्यातील व राज्यभरातील वारकऱ्यांच्या सोयीसाठी पंढरपूर नगरपालिका क्षेत्रात घेतलेल्या जागेवर धर्मशाळेचे भूमिपूजन संपन्न झाले.या भूमिपूजन सोहळ्यासाठी श्री १००८ गुरुवर्य प्रयागगिरीजी महाराज,श्री मोहनगिरी महाराज संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हभप राम महाराज पांगेरकर, संस्थापक सचिव हभप व्यंकट महाराज जाधव माळकौठेकर, प्रसिद्ध उद्योजक जगन्नाथ चक्रवार, स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्री विजयरावजी देवडे साहेब, सहसचिव प्रभाकर महाराज, कोषाध्यक्ष शिवाजी मदमवाड, संस्थापक सदस्य प्रवीण महाराज पारडीकर, गुलाब पा.उबाळे, हरिनाम पा.कदम,भगवान पा. रहाटीकर , बंडू पा.कदम, संस्थेचे मार्गदर्शक श्री रावसाहेब पा.,श्री दत्तराम पा.एडके ,श्री दत्तराम गोरठेकर, श्री शिवाजी पांगेरकर,श्री बालाजी जाधव, श्री बालाजी पा.भरकडे , श्री शिवाजी पांगेरकर, प्रसिद्धीप्रमुख चंपतराव डाकोरे, श्री गणेश पा.पवार, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा सौ.अनिताताई पतंगे, सचिव सौ.कालिंदीताई पंढरपूरकर, उपाध्यक्ष सौ.कान्होपात्राताई कुंडलवाडीकर,महिला सदस्य सौ.कुसुमताई शिंदे, सौ.जयश्रीताई जाधव शेकडो भाविक भक्त भजनी मंडळ पंढरपुर येथे उपस्थित होते. सर्वांनी श्री विठ्ठलरूक्मिणीचे सकाळी ७:०० वाजता दर्शन घेऊन ९ ते ११ या वेळेत नामदेव पायरी ते गुरूदेव नगर पंढरपूर इथपर्यंत टाळ मृदंगाच्या गजरात नामघोष करत शेकडो भाविक भक्त शोभायात्रेत सहभागी झाले होते. या शोभायात्रेत भाविकांना जागोजागी फळे वाटुन स्वागत करण्यात आले.

शोभायात्रा संपन्न झाल्यानंतर धर्मशाळेच्या जागेवर श्री श्री १००८ महंत प्रयागगिरीजी महाराज व श्री मोहनगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते भूमिपूजन व संस्थेच्या नाम फलकाचे अनावरण करण्यात आले. तदनंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष हभप राम महाराज पांगेरकर केले त्यांनी आम्ही वारकरी परिवाराच्या आजपर्यंतच्या कार्याबद्दल माहिती दिली. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन हभप व्यंकटराव पा.जाधव माळकौठेकर यांनी केले. याप्रसंगी राज्यस्तरीय जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पदाधिकारी उपस्थित होते यामध्ये प्रभाकर पा.पवळे, बालाजी पा.शिंदे, सोपान पा.गिरे, विठ्ठल पा. धारजणे, मारोती पा.वडजे, राजेश्वर पा.गागलेगावकर, श्री विवेकानंद पा.कसरे,श्री शंकर देवकत्ते, श्री माधवराव बोईनवाड, श्री उमाजी पा.धोंडगे,श्री बालाजी पा.पवार , श्री बबलू पा.वरताळे, श्री सतीश पानचावरे, श्री साहेबराव जाधव, श्री कपिल पांचाळ, श्री राजू घोरबांड साधारणता: तीनशेच्या वर पदाधिकारी उपस्थित होते..आम्ही वारकरी परिवाराच्या वतीने आलेल्या सर्व भाविकांना राहण्याची ,नास्ता व भोजनाची व्यवस्था केली होती. या कार्याचे संपूर्ण राज्यभरातून कौतुक होत आहे.

## निधन वार्ता



पिंपळनेर- विटाई तालुका साक्री येथील रहिवासी लक्ष्मीबाई अभिमन खैरनार (वय ८४ ) यांचे दिनांक १०/०६/२०२५ रोजी ठीक ५.३० दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी दिनांक ११/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० विद्यानगर चंद्रकांत मंगल कार्यालयाच्या पाठीमागे येथून निघेल, पिंपळनेर रोड स्थित स्मशानभूमीत अंत्यविधी होईल ते भाऊसाहेब खैरनार सेवानिवृत्त अभियंता बीएसएनएल धुळे व जि प प्राथमीक शिक्षक विजय खैरनार व नंदकुमार खैरनार यांच्या आई होत्या त्यांच्या पश्चात तीन मुले दोन मुली सुना नातवंडे असा परिवार आहे.

# वादळी वाऱ्याने देगलूर तालुक्यात हाहाकार
# वीज कोसळून म्हैस ठार; वीजपुरवठा २० तास ठप्प

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत



दि. ८ व ९ जून रोजी रात्रीच्या सुमारास आलेल्या वादळी वाऱ्याने आणि मुसळधार पावसाने देगलूर तालुक्यात कहर केला. प्रचंड वाऱ्यामुळे झाडे, विद्युत खांब जमीनदोस्त झाले; अनेकांची घरे उध्वस्त झाली. आकाशीय विजेचा फटका बसून मानूर गावात एक म्हैस ठार झाली. दरम्यान, तब्बल २० तास विद्युत पुरवठा खंडित राहिल्याने नागरिकांचे हाल झाले.

मृग नक्षत्राच्या आगमनानंतर पहिल्याच दिवशी आलेल्या या वादळी वाऱ्याचा परिणाम देगलूर शहरासह आसपासच्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर जाणवला. देगलूर-उदगीर राज्य महामार्गावरील चाकूर फाट्याजवळ झाड कोसळल्याने वाहतूक दोन तास ठप्प झाली.

मानूर येथील शेतकरी सायगोंडा गणगोंडा यांची म्हैस आकाशीय विजेने ठार झाली. हावरगा येथील व्यंकट लक्ष्मण गवलवाड, ज्ञानेश्वर व्यंकट गवलवाड, वळग येथील शिवराज केरबा चेरलापल्ले, लिंगनकेरूर येथील आनंद यशवंत कदम यांची घरे कोसळली.

देगलूर शहरात पहाटे दीड ते साडेतीनच्या दरम्यान प्रचंड वारे वाहू लागले. चिद्रावार मिल मैदानात आनंद मेळयासाठी उभारण्यात आलेल्या झुल्याचे मोठे नुकसान झाले. जिल्हा परिषद बांधकाम विभाग कार्यालयासमोर झाड कोसळले, तर लोहिया मैदान परिसरातील शरीफ जनरल स्टोअर्सवरही झाड आडवे पडले.

जुना सराफा मार्केट परिसरात विद्युत तार तुटून जमिनीवर पडली. सावित्रीबाई फुले शाळेजवळील एका घराच्या गॅलरीचा भाग तारांवर कोसळल्याने विद्युत पूल वाकला. देगलूर महाविद्यालयाजवळील परिसरात अनेक जुनी झाडे मोडून पडली. फिरोज दिन टॉकीजजवळ झाड रस्त्यावर पडल्याने वाहतूक ठप्प झाली.

चमकुमडी, करडखेड, हाणेगाव, मर्खेल परिसरात अनेक घरांचे टीनपत्रे उडाली. करडखेड परिसरात ३३ के.व्ही. लाईनचे ६ ते ७ पोल वाकले, तारा तुटल्या. नवीन बसस्थानकाच्या मागे झाडांची मोठ्या प्रमाणात मोडतोड झाली. शहरात अनेक घरांवरील पाण्याच्या टाक्या उडून गेल्या. काही नागरिकांच्या प्लॉटमध्ये लावलेली आंबा, पेरू, केळीची झाडे मोडून पडली.

वादळी वाऱ्यामुळे मध्यरात्री दीड वाजल्यापासून तालुक्याचा वीजपुरवठा खंडित झाला. सायंकाळपर्यंत महावितरणचे कर्मचारी खांब सरळ करणे, तारा जोडणे यांसाठी धडपड करत होते. दरम्यान, नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने घरगुती वस्तूंचे मोठे नुकसान झाले.

तालुक्यातील अनेक गावांच्या शिवारात शेकडो झाडे कोसळल्याने शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले असून प्रशासनाकडून नुकसानीचा अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे.

# गणू महाराज यांच्या वाढदिवसानिमित्त म्हसदी येथे त्रिदिवसीय कीर्तन महोत्सव

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



म्हसदी येथील छत्रपती संभाजी महाराज भजनी मंडळ व समस्त साईभक्त मंडळातर्फे ग्राम पुरोहित दिपांकर दीक्षित उर्फ गणू महाराज यांच्या १६ जूनला होणाऱ्या वाढदिवसानिमित्त दिनांक १४ जून ते १६ जून पर्यंत महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार यांचे तीन दिवसीय कीर्तन महोत्सव आयोजित केला आहे. शनिवारी दिनांक १४ रोजी निलेश महाराज लासलगावकर, रविवार दिनांक १५ रोजी कृष्णा महाराज भेंडाळीकर, तसेच सोमवारी १६ जून रोजी समाधान महाराज भोजेकर यांचे दणदणीत कीर्तन होईल. तीन दिवस दररोज सायंकाळी सहा ते सात हरिपाठ व नऊ ते ११ कीर्तन महोत्सव सचिदानंद गुरुमाऊली कृष्णाजी माऊली जायखेडकर यांच्या कृपाशीर्वादाने व साधुसंतांच्या उपस्थितीत कीर्तन महोत्सव होत आहे तरी साक्री तालुक्यातील भाविक भक्तांनी या कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आव्हान राजे छत्रपती संभाजी महाराज मित्र भजनी मंडळ, समस्त साईभक्त परिवार, व गणू महाराज मित्रपरिवार यांच्यातर्फे करण्यात येत आहे.




# कळवण तालुक्यातील अवकाळी पंचनाम्यांचा अहवाल सादर नुकसान भरपाईसाठी लागणार 1 कोटी रु.

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------------

वादळी वारे, अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे कळवण तालुक्यांमधील ९२ गावांमधील ९४६ शेतकऱ्यांच्या ३७८.२५ हेक्टरवरील क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले. आमदार नितीन पवार यांच्या मागणीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या निर्देशांनुसार महसूल, कृषी विभागाने नुकसानीचे पंचनामे पूर्ण करून शासनस्तरावर १ कोटी २ लाख ११ हजार ४१० रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी व गटविकास अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने शासनस्तरावर सादर केला आहे.

एप्रिलपाठोपाठ मे महिन्यामध्ये अवकाळी पावसाचा तडाखा शेतकऱ्यांना बसला. ६ ते १४ मेदरम्यान तालुक्याच्या ग्रामीण व आदिवासी भागात दाणादाण उडाली. काठरे दिगर, सुपले दिगर, खर्डेदिगर, पुनंदनगर, शिरसमणी, एकलहरे, नाकोडे, बेज, कोसवण, खिराड, मोहपाडा, तिऱ्हळ खुर्द, सरलेदिगर, मळगाव खुर्द, पिंपळे बु, देरभणगी, भैताणेदिगर, कोसुर्डे, जामले हतगड, चाफापाडा येथील घरांचे पत्रे, कांदा चाळीचे पत्रे, भिंत पडून घराचे तसेच बैल गोठा, हॉटेल व घरांचे ९८ ठिकाणी नुकसान झाले होते.

महसूल, कृषी विभागाच्या संयुक्त अहवालनुसार फळपिके सोडून कोरडवाहू जिराईत पिकाखालील



३३ टक्क्यांवरील एका शेतकऱ्याचे ०.१० हेक्टर क्षेत्रात नुकसान झाले असून, १३६० रुपयांची नुकसानभरपाई अपेक्षित आहे. फळपिके सोडून बागायत वार्षिक फळ पिकाखालील ९१ गावे बाधित झाले असून, ९४५ शेतकऱ्यांचे ३७८.१५ हेक्टर क्षेत्रात नुकसान झाले आहे. त्यात कांदा ३२६.५० हेक्टर, गहू ०.५० हेक्टर, २३.४५ हेक्टर बाजरी, ४.८० हेक्टर मिरची, ९.१० हेक्टर टोमॅटो, मका ०.२० हेक्टर, भाजीपाला १३. ६० हेक्टर नुकसान झाले.

**कांद्याचे ३२६ हेक्टर क्षेत्रात नुकसान**

अवकाळी पावसामुळे सुमारे ३७८ हेक्टरवरील उभे पीक, भाजीपाला, आंवा, फळ वागा आणि काढणी करून ठेवलेला कांदा, मका यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले. यात उन्हाळी कांदा लागवड क्षेत्र २८ हजार ७१६ हेक्टर कांद्याचे क्षेत्र असून, त्यात ३२६.५० हेक्टर क्षेत्रावरील शेतकरी वर्गाचे नुकसान झाले आहे.

*उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कळवण दौऱ्यात नुकसानीची माहिती दिली होती. त्यांनी तत्काळ जिल्हाधिकाऱ्यांना नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून अहवाल शासनस्तरावर पाठविण्याच्या सूचना केल्याने अहवाल सादर झाला आहे.*
*- नितीन पवार, आमदार*

*मे महिन्यात अवकाळी पावसामुळे तालुक्यातील ९२ गावांतील ३७८.२५ हेक्टर क्षेत्र बाधित होऊन ९४६ शेतकऱ्याच्या शेतीपिकांचे नुकसान झाले. ९८ ठिकाणी घर व कांदा चाळीचे नुकसान झाले आहे. मदतीसाठी नुकसानीचा अहवाल सादर केला आहे.*
*- रोहिदास वारुळे, तहसीलदार कळवण*